# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक :- 22/05/2020

सभा सुचना क्रं. 02

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा.स्थायी समिती दि. 02/05/2020 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | **ठराव :-** इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | सन 2020-21 या वित्तीय वर्षाकरीता अग्निशमन वाहन यांत्रिकी उपकरणांसाठी डिझेल, पेट्रोल व ऑईल खरेदी करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत व कार्यादेश देणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील वाहनांना डिझेल, पेट्रोल व ऑईल इंधन खरेदी करणे अत्यावश्यक असून सन 2020-2021 या वित्तीय वर्षाकरीता वाहनांच्या इंधनापोटी रक्कम रू. 30 लक्ष पर्यतच्या होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | अग्निशमन विभागातील कर्मचारी ग्रुप विम्याचे नुतनीकरण करणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. वसई शहर महानगरपालिका अग्निशमन विभागातील एकूण 239 कर्मचारी वर्ग यांचा एक वर्ष कालावधीसाठी दि. न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि. यांचेकडून सन 2020-21 या कालावधीकरीता ग्रुप विमा पॉलिसीचे नुतनीकरण करण्यास येणाऱ्या रक्कम रू. 24,99,952/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. सचिन देसाई**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 4. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील दि.02/03/2020 ते दि. 03/05/2020 या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त स्थायी समिती च्या माहितीसाठी | **ठराव :-** प्रस्तावात नमुद केलेनुसार उक्त कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनेचे प्रतिवृत्त जे माहितीसाठी सभेस दिलेले आहे त्याचे सभेने अवलोकन केले व त्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्रीम. ज्योती धोर्डेकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सुर्या योजना टप्पा 1 व 3 100द.ल.ली योजनेअंतर्गत दहिसर गाव येथील वैतरणा नदीवरील ब्रीजवर अंथरण्यात आलेल्या जुन्या व नविन पाईप लाईनचे विविध | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी रक्कम रू. 43,01,487/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांस व पुढील ई-निविदा कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. सचिन देसाई**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | अनुषंगीक कामे करणे व High Performance C.I Air valves & Sluice Valves बसविणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | |
| 6. | सन 2020-21 या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव/शिरवली ,पेल्हार तसेच फुलपाडा योजनेवरील जनीत्रे, वाहन इत्यादींकरीता (डिझेल) इंधन खरेदी करणे या कामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असुन पाणीपुरवठा विभाग मुख्यालयामार्फत पाणीपुरवठा जनीत्रे व वाहनांकरीता आवश्यकतेनुसार इंधन खरेदीस व त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्रीम. ज्योती धोडेंकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग सुर्या टप्पा 1 व 2 योजनेअंतर्गत मासवण येथील उद्‌ंचन केंद्रामधील अशुध्द पाण्याचे 300 HP क्षमतेचे 2 पंप बदलुन नविन पंप बसविणे व कार्यान्वीत करणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. मे. हायटेक ईंजिनिअरींग यांच्या रू. 41,00,000/- (प्रती नग) या दराने 2 पंप बदलून नविन पंप बसविणे व कार्यान्वित करण्याकरीता होणाऱ्या खर्चास निविदा समितने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. याकामी मनपातर्फे मनपा कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- सूचक :-**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती (जी) अंतर्गत वॉर्ड क्र. 115 मध्ये ससुनवघर येथील जूनी पाण्याची उंच साठवण टाकी तोडणे व 150 मी.मी. व 100 मी.मी. व्यासाची GI उर्ध्ववाहिनी व गुरुत्व जलवाहिनी पुरविणे, अंथरणे व जोडणे. | **ठराव** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. नितीन जी.म्हात्रे यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा. तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्रीम. शुभांगी गायकवाड सूचक :- मा.श्री. सचिन देसाई**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्व्हेक्षण व City Livability मुल्यांकना कामी अनुभवी शहर समन्वयक कंत्राटीतत्वावर नेमण्यास व या कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक | **ठराव** :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्व्हेक्षण व City Livability मुल्यांकनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 नुसार कु. दिपाली वामन पाटलेकर यांना कंत्राटी तत्वावर 6 महिन्यांकरीता केलेल्या नेमणूकीस व अन्य एक शहर समन्वय शासनाकडून मागविण्यास तसेच नियुक्तीस व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. सदर कामी पुढील कार्यवाहीचे अधिकार आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका |

| | | |
|---|---|---|
| | व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. | यांना प्रदान करण्यांत येत आहेत.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | सन 2020-21 हया वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती F मध्ये पावसाळयापुर्वी नालेखोदाईसाठी व गटारातील गाळ काढण्यासाठी बॅकहो लोडर, पोकलेन व इतर यंत्रसामुग्री भाडेतत्वावर पुरविणेकामी प्राप्त लघुत्तम दराच्या निविदाधारकासोबत संविदा करणेकामी कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव/विषय क्र. 19 दिनांक 20/01/2020 अन्वये प्रशासकीय वित्तीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्दी करून सकारात्मकदृष्ट्या पाहता सन 2020-21 या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "F" मध्ये पावसाळयापुर्वी नाले खोदाईसाठी व गटारातील गाळ काढण्यासाठी बॅकहो लोडर, पोकलेन इतर यंत्रसामुग्री भाडे तत्वावर पुरविणेकामी एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी 3 निविदाधारक पात्र आहेत. सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. सदर निविदेमध्ये मे. मारसा एंटरप्रायजेस यांचे निविदा दर 1 ते 15 बाबींमधील 6 बाबींसाठी न्युनतम आहेत. मे. मारसा एंटरप्रायजेस यांनी बाब क्र. 12,13,14 व 15 करीता निविदामधील भरलेले दर हे मागील वर्षाच्या दरांशी तुलना केली असता अ.क्र. 12 करीता (-) 10.46%, अ.क्र. 13 करीता (-)47%, अ.क्र. 14 करीता (-) 18.37%, अ.क्र. 15 करीता (-) 41.50% कमी दर आहेत. सबब सदर दर विचारात घेतलेले नाहीत. मे. स्टार सिव्हील कॉन्ट्रेक्टर्स यांचे दर लघुत्तम ठरत आहेत. त्यामुळे निविदाधारक मे.स्टार सिव्हील कॉन्ट्रेक्टर्स यांचेशी तृतीय वाटाघाटी दि. 29/04/2020 रोजी करण्यात आली असून त्यांनी आज दि. 01/05/2020 पर्यंत निविदेतील कोणत्याही वागाघाटी संदर्भात लेखी पत्र दिलेले नाही. तसेच त्यांना विचारणा/स्मरणपत्र दिले असता त्यांनी सदर स्मरणपत्राबाबतचे वाटाघाटी संदर्भात कोणतेही लेखी उत्तर दिलेले नाही. त्यामुळे निविदेतील इतर यशस्वी निविदाधारक मे.श्री. साईगणेश कन्स्ट्रक्शन ह्यांनी दि.01/05/2020 रोजीच्या वाटाघाटीच्या पत्राद्वारे सर्व बाबींकरीताचे दर कमी करून दिले असून महराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) याकामी कमी दराच्या निविदाधारकास मा.निविदा समिती व मा. आयुक्त ह्यांनी मान्यता दिली असून संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे कार्योत्तर मंजूरीकरीता शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सचिन देसाई सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | कोव्हीड-19 करीता विलगीकरण कक्षातील रुग्ण व वैद्यकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना चहा,नाश्ता व जेवण इत्यादी सुविधा पुरविणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर बाबत सभागृहांत साधक बाधक चर्चा करण्यांत येवुन कोरोना विषाणुच्या प्रार्दुभावामुळे ओढावलेल्या परिस्थितीत मा. आयुक्तांनी महापालिका अधिनियम 5.2.2 नुसार दिलेल्या प्रस्तावाबाबतची हॉस्पीटल व विलगीकरण कक्षातील रुग्ण व वैद्यकिय अधिकारी यांना पुरविण्यांत येत असलेल्या चहा/नाश्ता/जेवण इ. बाबतची मुळनस्ती मनपाच्या मुख्य लेखाधिकारी यांच्या मार्फत तपासुन सदरची देयके/नस्ती पुन:श्च मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यांत यावी याबाबतच्या कारवाईस ही सभा |

| | | |
|---|---|---|
| | | प्रशासकीय वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री सचिन देसाई**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 12. | कोव्हीड-19 संदर्भात शासनाकडील पत्रव्यवहार व कोव्हीड-19 नियंत्रणासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. | **ठराव / निर्णय :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग लक्षात घेता महानगरपालिका क्षेत्रात शासनाने वेळोवेळी कोव्हीड-१९ संदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, अधिसूचना च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी महानगरपालिकेकडून संपूर्ण व्यवस्था व वैद्यकिय सेवेकरिता वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नियोजन करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री सचिन देसाई**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरार शहर महानगरपालिका**